महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग,
बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ, मुंबई -४०० ००१.

**दूरध्वनी क्र. ०२२-२२८३९९२४** **ई मेल:** sopr२.rdd-mh@nic.in

पेसाअ-२०२२/प्र.क्र.५६/पं.रा.-२ दिनांक : २९ एप्रिल, २०२२

प्रति,

मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, (पुणे, ठाणे, पालघर, अहमदनगर, नाशिक, धुळे, नंदूरबार, जळगाव, नांदेड, अमरावती, यवतमाळ, चंद्रपूर व गडचिरोली)

**विषय : पेसा कायदा व पेसा ५% अबंध निधी योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीबाबत...**

संदर्भ : १) मा.राज्यपाल महोदयांकडील अधिसूचना क्रमांक आरबी/टीसी/ई-१३०१२(१)(२०१५)/अधिसूचना/५०६/२०१६, दिनांक १३ एप्रिल, २०१६.
२) आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक: पेसा-२०१५/प्र.क्र.१९/का-१७, दिनांक २१ एप्रिल, २०१५.
३) आदिवासी विकास विभाग, शासन शुध्दीपत्रक क्रमांक: पेसा-२०१५/प्र.क्र.१९/का-१७, दिनांक २० फेब्रुवारी, २०१६.
४) आदिवासी विकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक: टीएसपी-२०२०/प्र.क्र.७९/का-०६, दिनांक २० जानेवारी, २०२१.
५) ग्राम विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक: पेसाअ-२०१६/प्र.क्र.२३/पंरा-०२, दिनांक १५ जुलै, २०१६.

उपरोक्त संदर्भाधिन विषयान्वये कळविण्यात येते की, पेसा ५% अबंध निधी योजनेचे **राज्यस्तरावर नियंत्रण व सनियंत्रण** करण्यासाठी **राज्य पेसा कक्षाचे गठन** करण्यात आलेले आहे. राज्य पेसा कक्षामार्फत पेसा ५% अबंध निधी योजनेचा आढावा घेण्यात येत आहे. त्यासाठी सर्व पेसा जिल्ह्याकडून पेसा ५% निधीचे प्रगती अहवाल मागविण्यात येत आहेत. तसेच मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे निर्देशानसार आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचेमार्फत पेसा कायदा

अंमलबजावणीबाबत मुल्यमापन सूरू असून सदर मुल्यमापनाच्या सनियंत्रणासाठी राज्य पेसा कक्षातील अधिका-यांमार्फत सर्व पेसा जिल्ह्यांतील काही ग्रामपंचायतींचे पेसा कायदा अंमलबजावणी व पेसा ५% अबंध निधी योजनेचे सखोल सनियंत्रण करण्यात आलेले आहे. सदर सनियंत्रण पाहणीदरम्यान आढळून आलेल्या बाबी व त्रूटींच्या अनुषंगाने पेसा ५% अबंध निधी योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीबाबत आपण खालील मुद्द्यांच्या अनुषंगाने तात्काळ आढावा घेवून उचित कार्यवाही करणे आवश्यक आहे.

१) पेसा ५% अबंध निधी योजनेबाबत संदर्भ क्रमांक २ व ३ मधील मार्गदर्शक सूचनांचे अनुपालन बहुतांश ग्रामपंचायतींमध्ये होत नाही, असे दिसून येत आहे. सदर शासन निर्णयातील पहिल्या परिच्छेदामध्ये नमुद केलेनुसार पेसा ५% अबंध निधी **अ) पायाभूत सुविधा, ब) वन हक्क अधिनियम (FRA) व पेसा (PESA) कायद्याची अंमलबजावणी, क) आरोग्य, स्वच्छता, शिक्षण व ड) वनीकरण, वन्यजीव संवर्धन, जलसंधारण, वनतळी, वन्यजीव पर्यटन व वन उपजीविका** या घटकांतर्गत प्रत्येकी १/४ या प्रमाणात विनियोग होणे अभिप्रेत आहे. मात्र सदर निधी बहुतांश ठिकाणी केवळ पायाभूत सुविधा / बांधकांमांवर खर्च केला जातो, असे आढळून आलेले आहे. सदर बाब निश्चितच योग्य नसून पेसा अंतर्गत **सर्व घटकांचा समतोल राखण्यासाठी चारही घटकांमधील उपक्रमांचा ग्रामपंचायत विकास आराखड्यात समावेश होईल** याबाबत आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करण्यात यावी.

२) पेसा ५% अबंध निधी योजनेअंतर्गत प्राप्त निधीचा समावेश ग्रामपंचायत विकास आराखड्यात (GPDP) करून पंचवार्षिक व वार्षिक आराखडे तयार करणेबाबत राज्य व केंद्र शासनाकडून वेळोवेळी मार्गदर्शक सूचना निर्गमित करणेत आलेल्या आहेत. मात्र बहुतांश ग्रामपंचायतींचे वित्त आयोगाचे आराखडे व पेसा ५% अबंध निधी योजनेचे आराखडे स्वतंत्रपणे/वेगवेगळे तयार करण्यात आलेले आहेत. अशा स्वरूपाचे स्वतंत्र व वेगवेगळे आराखडे तयार करणे अपेक्षित नाही. तसेच पेसा उपक्रमांचा समावेश असलेल्या पंचवार्षिक आराखड्यांच्या आधारे ग्रामपंचायतींनी वार्षिक ग्रामपंचायत विकास आराखडे तयार करून तालुकास्तरीय छाननी समितीकडून, पंचवार्षिक आराखडा व उपक्रमनिहाय प्रकल्प अहवालाच्या आधारे, वार्षिक ग्रामपंचायत विकास आराखड्यांची छाननी होणे बंधनकारक आहे. मात्र पाहणी केलेल्या बहुतांश ग्रामपंचायतींनी पंचवार्षिक आराखडे व प्रकल्प अहवाल तयार केले नसल्याचे निदर्शनास आले आहे.

ग्रामपंचायतीचे वार्षिक विकास आराखडे तयार करताना पंचवार्षिक आराखड्यामध्ये समाविष्ट केलेल्या उपक्रमांचाच समावेश प्राधान्यक्रमानुसार ग्रामपंचायतीच्या वार्षिक विकास आराखड्यात करणे अनिवार्य आहे. मात्र या बाबीचे उल्लंघन करून ग्रामपंचायतींचे वार्षिक आराखडे तयार केल्याचे आढळून आले आहे. तसेच पंचवार्षिक आराखडा व उपक्रमनिहाय प्रकल्प अहवाल उपलब्ध नसताना तांत्रिक छाननी समित्यांनी ग्रामपंचायत विकास

आराखड्यांची छाननी करून नियमबाह्य मान्यता दिल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे याबाबत आपणास असे सूचित करण्यात येते की, सर्व तालुकास्तरीय छाननी समित्यांच्या कामकाजाचा आपल्या स्तरावरून आढावा घेवून संबंधीत समित्यांना योग्य त्या सूचना निर्गमित कराव्यात. तसेच तांत्रिक छाननी समितीकडून नियमबाह्य मान्यता दिलेल्या वार्षिक ग्रामपंचायत विकास आराखड्यांबाबत नियमानुसार आवश्यक ती कारवाई करून आवश्यकतेनुसार फेरमान्यतेची कार्यवाही तात्काळ करण्यात यावी.

३) संदर्भ क्रमांक २ मधील शासन निर्णयासोबतच्या परिशिष्टातील मुद्दा क्रमांक ४ मधील दुस-या परिच्छेदामध्ये नमुद केलेनुसार पेसा ५% अबंध निधी योजनेमधून घेण्यात येणा-या उपक्रमांची पुनरावृत्ती (Duplication) होत असल्याचे दिसून आले आहे. ग्रामपंचायतींना उपलब्ध होणा-या पेसा ५% अबंध निधीमधून पाहणी केलेल्या बहुतांश ग्रामपंचायतींमार्फत केवळ बांधकामे/साहित्य खरेदी अशा स्वरूपाची कामे घेतली आहेत. जी कामे नियमित शासकीय योजना, वित्त आयोग, जिल्हा वार्षिक योजना, विविध अभियाने, उपक्रम, प्रकल्प इत्यादीद्वारे सहजतेने राबविता आली असती; बहुतांश अशीच कामे, पेसा ५% अबंध योजनेमधून सर्रासपणे घेण्यात येत आहेत. सदर शासन निर्णयासोबतच्या परिशिष्टातील मुद्दा क्रमांक ५ मधील निधीच्या खर्चातील अनुज्ञेय बाबींबाबत दुर्लक्ष होत असल्याचे बहुतांश ग्रामपंचायतींमध्ये दिसून आले आहे. परिशिष्टातील मुद्दा क्रमांक ५ मधील बाबींकडे दूर्लक्ष करून पायाभूत सुविधा आणि बांधकामांसाठी पेसा ५% अबंध निधीचा विनियोग होत असल्याची बाब योजनेच्या निकषांचे उल्लंघन करणारे आहे. तथापि पेसा ५% अबंध निधीमधून घेण्यात येणा-या कामांची/उपक्रमांची पुनरावृत्ती (Duplication) होणार नाही यांसाठी संबंधीत तांत्रिक छाननी समित्या, ग्राम विकास अधिकारी/ग्रामसेवक यांना आपल्या स्तरावरून सक्त सूचना निर्गमित करण्याची कार्यवाही करावी.

४) आदिवासी विकास विभागाकडील शासन निर्णय क्रमांक: पेसा-२०१५/प्र.क्र.९८/का-१७, दिनांक २१ ऑगस्ट, २०१५ अन्वये ग्रामसभा कोष संदंर्भातील मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. सदर शासन निर्णयासोबतच्या परिशिष्टामध्ये अनुसूचित क्षेत्रातील गावात ग्रामसभेच्या कामकाजा संबंधाने ठेवावयाच्या नोंदवह्या विहित करण्यात आलेल्या आहेत. मात्र काही तालुक्यांतील अपवाद वगळता बहुतांश ग्रामपंचायतींमध्ये ग्रामसभा कोष कार्यरत नसल्याचे निर्देशनास आले आहे. तसेच संबंधीत ग्रामपंचायतींनी सदर निधीबाबत ठेवावयाचे अभिलेख देखील सुव्यवस्थित ठेवलेले नसून प्रशासकीय प्रक्रिया व आर्थिक पारदर्शकतेचा अभाव असल्याचे दिसून आले आहे. काही अपवाद वगळता पाहणी केलेल्या बहुतांश ग्रामसभा कोषांचे अभिलेख अपूर्ण स्वरूपाचे आहेत. रोकडवहीतील अपु-या नोंदी, विनियोग केलेल्या निधीचे नियमानुसार कोटेशन, निविदा (Tender) किंवा दरपत्रक न मागवताच निधी खर्च करणे, अनुज्ञेय नसलेल्या रकमा आकस्मित निधी म्हणून खर्च करणे,

खर्चास ग्रामसभेची पूर्व मान्यता न घेणे इत्यादी स्वरूपाच्या गंभीर बाबी निदर्शनास आलेल्या आहेत. या अनुषंगाने आपणास असे सूचित करणेत येते की, आपल्या जिल्ह्यातील सर्व पेसा ग्रामपंचायतींचे अभिलेख व्यवस्थापन व दप्तर तपासणीचा कार्यक्रम आखून ग्रामपंचायत/ग्रामसभा कोषांचे सर्व अभिलेख, नोंदवह्या व प्रशासकीय प्रक्रिया पारदर्शक पध्दतीने परिपूर्ण करून घ्याव्यात व सर्व ग्रामपंचायतींकडून ग्रामपंचायत लेखा संहिता, २०११ चे अनुपालन होत असल्याचे सुनिश्चित करावे.

५) महाराष्ट्र ग्रामपंचायती संबंधीचे उपबंध (अनुसूचित क्षेत्रावर विस्तारित करणे) नियम, २०१४ चे कलम १४ मध्ये नमुद व आदिवासी विकास विभागाकडील शासन निर्णय क्रमांक: पेसा-२०१५/प्र.क्र.९८/का-१७, दिनांक २१ ऑगस्ट, २०१५ अन्वये ग्रामसभा कोष समितीचा कार्यकाळ ५ वर्षांचा निर्धारीत करणेत आलेला आहे. मात्र काही ग्रामपंचायतींमध्ये सन २०१५-१६ मध्ये स्थापन केलेल्या समित्या निर्धारीत कार्यकाळ संपुष्टात येवूनही अस्तित्वात असल्याचे सांगितले जाते. तसेच सदर समित्या स्थापन केल्याचे ग्रामसभेचे ठराव देखील सध्या आढळून येत नाहीत. काही ग्रामपंचायतींमध्ये ग्रामसभा कोष समितीचे अध्यक्ष हे सरपंच असल्यामुळे या समित्या केवळ नावापुरत्याच अस्तित्वात असल्याचे आणि समित्यांचे आर्थिक स्वरूपाचे कामकाज प्रत्यक्षात सरपंच व ग्रामसेवक करत असल्याचे निर्देशनास आले आहे. त्यामुळे याबाबत आपणास असे निर्देश देण्यात येत आहेत की, ज्या समित्यांचा कार्यकाळ संपुष्टात आलेला आहे, अशा समित्यांचे पुनर्गठन तात्काळ करावे. तसेच ग्रामपंचायती अंतर्गत प्रत्येक पेसा गावात स्वतंत्र ग्रामसभा कोष समिती अपेक्षित असल्यामुळे ग्रामपंचायती अंतर्गत एकापेक्षा जास्त ग्रामसभा कोष समित्याच्या अध्यक्षपदी सरपंच यांना नियुक्त करणे व्यावहारिक दृष्ट्या योग्य ठरत नाही. संबंधीत सरपंचांकडे ग्रामपंचायतीच्या कामकाजाच्या अनुषंगाने असलेल्या अन्य महत्वाच्या जबाबदा-या तसेच पेसा कायद्यानुसार प्रत्येक पेसा गावांना अधिकार व सत्तेचे विकेंद्रीकरण करणे गरजेचे असल्यामुळे प्रत्येक पेसा गावासाठी ग्रामसभा कोष समितीचा अध्यक्ष सरपंचांव्यतिरिक्त पेसा गावातील अन्य व्यक्ति नियुक्त होईल याची खातरजमा करावी.

६) महाराष्ट्र अनुसूचित क्षेत्रातील गौण वनोत्पादनाच्या मालकीचे हस्तांतरण व महाराष्ट्र गौण वनोत्पादन (व्यापाराचे विनियमन) (सुधारणा) अधिनियम, १९९७ चे कलम (४) व महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ चे कलम (४५-क) चे पोटकलम (सात) मधील तरतूदीनुसार **अनुसूचित क्षेत्रातील शासकीय जमिनीमध्ये आढळणा-या गौण वनोत्पादनाची मालकी पंचायतीकडे निहित केलेली आहे**. प्राप्त मालकी हक्कानुसार संबंधीत पंचायत, ग्रामसभेच्या निदेशांना अधिन राहून गौण वनोत्पादनाचे समुपयोजन, व्यवस्थापन व व्यापार यांचे विनियमन करण्यास सक्षम असेल, असे नमुद करण्यात आलेले आहे. तसेच महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ चे कलम ५७ चे पोटकलम ३ (च क) मधील तरतूदीनुसार अनुसूचित क्षेत्रातील शासकीय जमिनीमध्ये आढळणा-या, पंचायतीच्या अधिकारितेत असलेल्या, त्या

पंचायतीकडे निहित असलेल्या आणि अनुसूचित क्षेत्रात गोळा केलेल्या गौण वनोत्पादनाच्या विक्रीचे उत्पन्न व स्वामित्वधन **"ग्राम निधी"** मध्ये जमा करणे कायद्याने बंधनकारक आहे. मात्र बहुतांश ग्रामपंचायतीमध्ये असे आढळून आलेले आहे की, गौण वनोत्पादनाच्या विक्रीपासून प्राप्त उत्पन्न व स्वामित्वधन ग्राम निधी मध्ये जमा केले जात नसून सदर रक्कम अद्यापही **ग्रामसभा कोष किंवा अन्य ठिकाणी** जमा असल्याचे दिसून येते. तसेच काही ग्रामपंचायतींमध्ये सदर रक्कमेचा विनियोग ग्रामसभा कोषांनी/वन व्यवस्थापन समित्यांनी ग्रामपंचायतीच्या पूर्वपरवानगी शिवाय परस्पर व वैयक्तिक लाभासाठी केल्याचेही आढळून आलेले आहे.

ग्रामपंचायतींच्या कार्यक्षेत्रातील गौण वनोत्पादनाच्या विक्रीपासून प्राप्त उत्पन्न व स्वामित्वधनाबाबत असे निर्देश देण्यात येत आहेत की, गौण वनोत्पादनाच्या विक्रीपासून प्राप्त उत्पन्न व स्वामित्वधनाची रक्कम महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ चे कलम ५७ चे पोटकलम ३ (च क) मधील तरतूदीनुसार **"ग्राम निधीमध्ये"** तात्काळ जमा करून घ्यावी. तसेच सदर निधीचा समावेश **ग्रामपंचायत विकास आराखड्यातील उत्पन्नाचे स्रोत** (Resource Invelope) मध्ये **स्व-उत्पन्न** (OSR) घटकांतर्गत करून सदर निधीचा विनियोग महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ चे कलम ५८ चे पोट-कलम (२) मधील तरतूदीनुसार केवळ संबंधीत पेसा गावाच्या विकासासाठीच करावा. तसेच सदर निधीमधून कोणत्याही स्वरूपाचे वैयक्तिक लाभ दिले जाणार नाहीत, याची दक्षता आपल्यास्तरावरुन घेण्यात यावी.

(७) ग्रामपंचायतींमध्ये अद्यापही मोबिलायझरची निवड संपर्क व्यक्ती म्हणून झालेली नाही, असे दिसून आले आहे. तसेच काही ग्रामपंचायतींचे मोबिलायझर यांचे मानधन वेळेत मिळत नाही, काही मोबिलायझर काम करत नाहीत, काही मोबिलायझर यांना त्यांच्या जबाबदा-या व कर्तव्ये माहित नाहीत, काहींचे अद्याप प्रशिक्षणच झालेले नाही, काही ग्रामपंचायतींमध्ये निवडलेल्या मोबिलायझरचे शिक्षण अत्यल्प असल्यामुळे त्यांना काम जमत नाही, काही मोबिलायझरचे मानधन निवडलेल्या स्वयंसहाय्यता गटाच्या बँक खात्यामध्ये जमा होते, मात्र संबंधीत गट डिफॉल्टर असल्यामुळे मोबिलायझरचे मानधन अदा होत नाही. काही ग्रामपंचायतींमध्ये पात्र गट उपलब्ध नसल्यामुळे मोबिलायझरची निवडच करता येत नाही तर काही मोबिलायझरची नियुक्ती गावातील स्वयंसहाय्यता गटा अभावी थेट ग्रामसभेने केली आहे तर काही ग्रामपंचायतींमध्ये अपात्र गटांची देखील निवड ग्रामसभा मोबिलायझेशनच्या कामासाठी करण्यात आलेली आहे. अशा वेगवेगळ्या स्वरूपाच्या समस्या ग्रामसभा मोबिलायझेशन प्रक्रियेबाबत दिसून आलेल्या आहेत. ग्रामसभा मोबिलायझेशन आणि ग्रामसभा मोबिलायझर यांची निवड या प्रक्रियेबाबत अनेक संभ्रम असल्याचे दिसून आले आहे. तरी या प्रक्रियेबाबत आपल्या जिल्ह्यांतील परिस्थितीचा सविस्तर आढावा घेवून सर्व मोबिलायझर्सच्या समस्यांचे निराकरण करावे व अनुसूचित क्षेत्रातील सर्व मोबिलायझर्सना कार्यप्रवण करून ग्रामसभा संसंगिकरणाची प्रकिया गतीमान करण्यात यावी.

८) आदिवासी विकास विभागाच्या शासन निर्णय क्रमांक: टीएसपी-१०८६/८७१०/प्र.क्र.३१/का-५, दिनांक ९ मार्च, १९९० मधील विवरणपत्र-अ अन्वये घोषित अनुसूचित क्षेत्रातींल काही गावांना अद्याप पेसाचे लाभ दिले जात नाहीत असे निदर्शनास आलेले आहे. याबाबत आपल्या स्तरावरून आढावा घेवून सदर शासन निर्णयामध्ये नमुद सर्व गावांना अनुसूचित क्षेत्राचे लाभ देण्याची आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी.

पंचायतीसबंधीचे उपबंध (अनुसूचित क्षेत्रावर विस्तारित करणे) अधिनियम, १९९६ व पेसा ५% अबंध निधी योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीबाबत उपरोक्त सर्व मुद्द्यांच्या अनुषंगाने आपले अधिनस्त उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) तथा नोडल अधिकारी (पेसा), अनुसूचित क्षेत्रातील सर्व पंचायत समित्तांचे गट विकास अधिकारी, सहाय्यक गट विकास अधिकारी, जिल्हा परिषद व पंचायत समित्यांचे सर्व विभाग प्रमुख, विस्तार अधिकारी (सर्व), सरपंच, ग्राम विकास अधिकारी/ग्रामसेवक व इतर सर्व संबंधीतांच्या पेसा अंतर्गत कामाचा सविस्तर आढावा घेवून संबंधीतांना यथायोग्य मार्गदर्शक सूचना तात्काळ निर्गमित करण्यात याव्यात.

या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीचा बाबनिहाय अनुपालन अहवाल संचालक, राज्य (पेसा), राज्य पेसा कक्ष, पुणे यांना सादर करावा.

**(राजेश कुमार)**
अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१) प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

२) संचालक, राज्य (पेसा), राज्य पेसा कक्ष, पुणे यांनी उपरोक्त प्रमाणे कार्यवाहीबाबतचा अनुपालन अहवाल १३ पेसा जिल्ह्यांकडून प्राप्त करून घ्यावा व एकत्रित अहवाल शासनास सादर करावा.

३) राज्य प्रकल्प संचालक, राज्य प्रकल्प व्यवस्थापन कक्ष, राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे-०५ यांना मुद्दा क्र. २ व ७ चे अनुषंगाने उचित कार्यवाहीसाठी प्रत अग्रेषित.

४) उपायुक्त (विकास) तथा नोडल अधिकारी (पेसा), विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व) यांना उचित कार्यवाहीसाठी प्रत अग्रेषित.